
# हे वाचलं का?

रसिक वाचक मित्रहो !
सातत्याने बाजारात इतकी नवी पुस्तके येत असतात, की पुस्तक पेठेत आल्यावर नेमके कोणते पुस्तक घ्यावे तेच उमजत नाही. म्हणूनच आम्ही अधून मधून काही खास नव्या पुस्तकांची शिफारस करून माहिती देत असतो – 'हे वाचलं का?' या सदरात. तर याच सदरात आज नव्याने आलेल्या १० उत्तम पुस्तकांची माहिती देत आहोत.
जरूर खरेदी करून वाचा ही पुस्तके !





1. **पुस्तकाचे नाव : द हाउस ऑफ पेपर**
   **लेखक : कार्लोस मारिया दोमिंगेझ्** /
   **भाषांतर : अभिषेक धनगर**
   **किंमत : ३५०/-**
   **विशेष सवलतीत : २८०/-**

अलीकडे मराठीत 'बुकस ऑन बुकस' प्रकारची अनेक पुस्तके येत आहेत. हे तशाच प्रकारचे एक पुस्तक. अभिषेक धनगर या उत्तम वाचक आणि वॉल्डन पब्लिकेशन सुरू करणाऱ्या प्रतिभावंत तरुणाने हा उत्कृष्ट अनुवाद केला आहे. अगदी जरूर वाचावा असा.

पुस्तकं वाचणं, पुस्तकांचा शोध घेणं, संग्रह करणं, आपल्या व्यग्र जीवनात फुरसतीचे काही तास रोज बाजूला ठेवून पुस्तकांच्या जगात हरवून जाणं, या राखून ठेवलेल्या वेळेच्या आधारावर आयुष्याचे घाव सोसत राहणं... ही प्रक्रिया वाचकाला आनंददायी आणि हवीहवीशी वाटत असते; पण ग्रंथसंग्रहाच्या आवडीचं वेडात रूपांतर झालं, की खिशाला कात्री लावून महागडी पुस्तकं विकत घेणं, त्यासाठी हळूहळू जगण्याचे सगळे प्राधान्यक्रम बाजूला सारत पुस्तकं अग्रक्रमाला येणं, आधी एक फडताळ, मग एक कपाट, नंतर एक खोली असं करत पुस्तकांना सगळ्या घराचा ताबा घेऊ देणं, संग्रहाची वर्गवारी करणं या अवघड गोष्टींना सामोरं जावं

लागतं. हे सगळं समोर दिसत असूनही ग्रंथवेड काही वाचकाला स्वस्थ बसू देत नाही. आणि हे वेड अखेरीस जे दु:स्वप्न वाचकापुढं उभं करतं, त्या दु:स्वप्नाची ही कादंबरी. एक अविस्मरणीय असा भीषण सुंदर अनुभव ती वाचकाला देते.




2. **पुस्तकाचे नाव : झपाटलेला शिलेदार**

**सर्वान्तीस : जीवन व कार्य**

**लेखक : विजय पाडळकर**

**किंमत : ४५०/-**

**विशेष सवलतीत : ३५०/-**

डॉन किहोते ही मिगेल सर्वान्तीसची प्रचंड गाजलेली इतिहास निर्माण करणारी महाकादंबरी. त्यातला स्वप्ने पाहणारा डॉन आणी वास्तवाचे भान असणारा त्याचा साथीदार सांचो ही इतिहासात अजरामर झालेली जोडी. या महाकादंबरीने झपाटून गेलेल्या पाडाळकर यांचे हे पुस्तक अगदी वाचायलाच हवे असे आहे.

‘डॉन किहोते’ ही मिगेल द सर्वान्तीसची कादंबरी वाचताना मला अकस्मात जाणवले, की मी म्हणजे डॉन आणि सांचो यांचे मिश्रणच आहे. माझ्या मनात असंख्य स्वप्ने भिरभिरत असतात, अनेक भ्रमांच्या मागे मी ओढला जातो, कल्पनेच्या राज्यात गुंग होण्याची सवय अजून गेलेली नाही, स्वप्ने पाहण्याचे मी थांबवीत नाही, कारण ती थांबविणे माझ्या हाती नसतेच. दुसरीकडे सांचोप्रमाणे माझी धाव कुठपर्यंत आहे हे मी जाणतो, माझी सुस्थिर जीवनाची ओढ मला सीमेपलीकडे जाऊ देत नाही, वेडे होऊ देत नाही. आणि मग माझ्या ध्यानात आले की, प्रत्येक माणसातच या दोघांचे मिश्रण आहे. माणसामाणसांत फरक असतो तो या मिश्रणातील

प्रमाणामुळे. ज्यांच्यात डॉनचे प्रमाण अधिक ते कलावंत, कवी, द्रष्टे किंवा वेडे बनतात; ज्यांच्यात सांचो अधिक प्रमाणात असतो ते व्यवहारी बनतात, चिवटपणे जगतात, निमूटपणे मरतात पण जगताना कधीकधी एखाद्या डॉनलाही जगवतात.... एका झपाटलेल्या लेखकाने केलेल्या, 'डॉन किहोते' या महाकादंबरीच्या पाठलागाची कहाणी सांगणारा मराठीतील आगळावेगळा ग्रंथ.


3. **पुस्तकाचे नाव : स्कालपेल ते स्कोपी ते रोबो**

**(कॅन्सरतज्ञ डॉ. शैलेश पुणतांबेकर यांच्या चतुरस्त्र कार्याचा आलेख)**

**लेखक : डॉ. चित्रलेखा पुरंदरे**

**किंमत : ३५०/-**

**विशेष सवलतीत : २६५/-**




ही कहाणी आहे एका आधुनिक सुश्रुताची.
सुप्रसिद्ध शल्यचिकित्सक डॉ. शैलेश पुणतांबेकर
यांच्या चतुरस्त्र कार्याची.
असंख्य कॅन्सररुग्णांवर यशस्वी उपचार करणारे,
जगभरातील अनेक देशांमध्ये जाऊन
शल्यचिकित्साविषयक मार्गदर्शन
आणि शस्त्रक्रिया करणारे,
‘पुणे टेक्निक' हे नवे शल्यतंत्र विकसित करणारे,
ख्यातनाम सर्जन डॉ. शैलेश पुणतांबेकर यांच्या
अनोख्या प्रवासाचा घेतलेला वेध.


* * *

**डॉ. शैलेश पुणतांबेकरबद्दल किती सांगू? किती लिहू? कमीच आहे.**

**तो एकदम पुरुषोत्तम, सर्जनशील सर्जन आहे. त्यानं संशोधन केलेल्या टेक्निकला त्यानं 'पुणतांबेकर टेक्निक' असं नाव न देता 'पुणे टेक्निक' असं नाव दिलंय. मला त्याबद्दल त्याचं विशेष कौतुक वाटलं. "मी जो आत्ता आहे; तो.. सर, तुमच्यामुळे आहे" असं जेव्हा तो मला म्हणतो, तेव्हा (त्याच्याबद्दल मला वाटणाऱ्या) अभिमानानं मन भरून येतं! माझं त्याच्यावरखूप प्रेम आहे. ते वृद्धिंगत होत आहे!**

**शैलेश, असाच महान हो ! कायम उत्साही, आनंदी यशस्वी रहा एवढंच सांगतो आणि थांबतो !**

**- डॉक्टर अरूण जामकर. कुलगुरू, एम यू एम एस, नाशिक.**




4. **पुस्तकाचे नाव : सांस्कृतिक आक्रमण आणि मराठी कादंबरी**

**लेखक : सुधीर रसाळ**


**किंमत : ३००/-**

**विशेष सवलतीत : २४०/-**

प्रत्येक संस्कृती आपल्यातील उणिवा, त्रुटी दूर करत स्वतःहून बदलत असते. आधीच आपली संस्कृती अवनतावस्थेत गेलेलीच होती. तिच्यातील परिवर्तनक्षमता नष्ट झालेली होती. ब्रिटिशांनी सत्ता मिळताच त्यांच्याकडे असलेल्या सामाजिक संस्था इथेही स्थापन केल्या. त्याचा परिणाम असा झाला की, आपल्या नवनव्या गरजांच्या पूर्ततेसाठी आपल्या स्वतःच्या संस्था निर्माण करण्याऐवजी त्यांच्याकडे जे काही नवे असेल ते इकडे आणणे सुरू झाले. हीच प्रवृत्ती वाङ्मयक्षेत्रातही बळावली. गेल्या दोनशे वर्षांपासून आक्रमण करत असलेल्या आणि सावकाशपणे, कळत-नकळत आपल्या संस्कृतीचा विनाश करू लागलेल्या पाश्चात्त्य संस्कृतीच्या आक्रमणाकडे स्वभावतःच संवेदनशील असलेल्या लेखकांचे लक्ष का गेले नाही आणि वा गंभीर समस्येवर निर्मिती कां झाली नाही, असा प्रत्र मात्र उपस्थित होतो. आपले लेखक स्वतः चे निरीक्षण करून स्वतःच्या समस्यांवर केव्हा लिहू लागतील ?..."

*- प्रस्तावनेतून*

सांस्कृतिक आक्रमणाच्या अंगाने मराठी कादंबरीच्या इतिहासाचा धांडोळा घेणाऱ्या या ग्रंथात रसाळ सरांनी रणांगण, कोसला, बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर, बनगरवाडी, गोतावळा, पाचोळा, रौडाळा या कादंबऱ्यांचा आढावा घेतला आहे.




5. **पुस्तकाचे नाव : पाळीचं पॉलिटिक्स**

**लेखक : ऐश्वर्या रेवडकर**

**किंमत : २००/-**


**विशेष सवलतीत : १५०/-**

निव्वळ लिंगभेद मानायचा तर 'स्त्री' आणि 'पुरुष' या दोनच घटकांमध्ये मानवी जगाला विभागता येतं. आणि युगानुयुगे लिंगभेदच मानत राहिल्यामुळे निसर्गातः प्राप्त होत असलेल्या शारीरिक ताकदीच्या बळावर पुरुषानं या जगावर कायमच स्वतःची सत्ता स्थापित केल्याचं चित्र दिसत आलेलं आहे. मुद्दा केवळ शारीरिक ताकदीचाही नाही, तर स्त्रीमध्ये असलेल्या 'स्त्रीत्वा'चा मुद्दा तिला पुरुषी व्यवस्थेमध्ये सदैव दुय्यम स्तरावर जगायला भाग पाडत आलेला आहे. स्त्री-पुरुष संबंधांमध्ये 'पुरुष उत्सर्जन करतो आणि स्त्री सृजन करते', असं शारीर-पातळीवरचं एक मूलभूत (पण 'ललित' भाषेतलं) विधान मी कधीतरी लिहिलं होतं. स्त्रीला येणारी 'पाळी' ही या सृजनविषयक शरीररचनेचा सर्वाधिक महत्त्वाचा, मूलभूत आणि अपरिहार्य असा भाग आहे. रजःस्वला स्त्रीच्या योनीमार्गातून होणारा हा मासिक रक्तस्राव आणि त्या अनुषंगानं तिच्यात होणारे मानसिक-शारीरिक बदल याविषयी सामान्यपणे पुरुषांच्या जगात कमालीचं अज्ञान असतं. शिवाय पुरुषी जाणिवेतून आलेली अनास्था, अनेकदा किळस, जुगुप्सा (किंवा क्वचित दयाभाव) असल्या गोष्टींनीही हा अवकाश पूर्वापार व्यापलेला आहे. लैंगिक संबंध, त्याविषयक स्त्री-पुरुषांचं परस्पर-देहभान, मासिक पाळी आणि तिचा प्रजननाशी असलेला अध्याहत संबंध आणि या दरम्यानची विशेषतः स्त्रीमध्ये घडून येणारी मानसिक-शारीरिक आंदोलनं, असल्या गोष्टींबद्दल उघडपणे बोलता येण्याची चोरी, हे आपल्या समाजाच्या कथित सोवळेपणाचं एक व्यवच्छेदक लक्षण मानता येईल, इतपत आपलं समाजमन या विषयात मागासलेलं आहे. 'विहीरीची मुलगी' ही पहिलीच कादंबरी गाजलेल्या डॉ. ऐश्वर्या रेवडकर यांनी

'पाळीचं पॉलिटिक्स'मधून पाळीसोबतच स्त्री-पुरुष संबंधातले भावनिक मानसिक शारीरिक अंतःस्तर, त्यातून उद्भवणारे सर्वस्तरीय आरोग्य-अनारोग्य या सगळ्या विषयांना हात घातलेला आहे. ऐश्वर्या यांच्या लेखनाचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे त्या या विषयासंबंधित केवळ शास्त्रीय भाषेतली माहिती देत नाहीत, तर या लेखनातून त्या वाचकांशी गप्पा मारतायत, अशी त्यांची लेखनशैली आहे. त्या 'प्रतिपादन' करत नाहीत, तर त्या वाचकांना 'समजावून सांगत' राहतात. त्यामुळे एरवी कदाचित रूक्ष किंवा अनाकलनीय वाटेल, अशी माहिती सामान्य वाचकांना केवळ समजतेच असं नाही, तर ती त्यांच्या आत मूलभूत मानवी संवेदनही जागवत राहते. मला वाटतं, ही अनेक अर्थांनी खूप महत्त्वाची गोष्ट आहे. हे 'पॉलिटिक्स' आणि त्यानुषंगानं या पुस्तकात आलेलं कथन सर्वच स्त्री-पुरुषांनी वाचणं आवश्यक आहे.

*- बालाजी सुतार*

6. **पुस्तकाचे नाव : पेरियार - मिथक आणि वास्तव**
**लेखक : दिपक गायकवाड**
**किंमत : ४५०/-**
**विशेष सवलतीत : ३६०/-**




एका योद्ध्यामध्ये असणारी आक्रमकता ही जर एका विचारवंतामध्ये उतरली, तर तो आपली विचारांची लढाई कसा लढतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे ई. व्ही. रामासामी उर्फ पेरियार, 'पेरियार' ही द्रविड जनतेने त्यांना त्यांच्या महान कार्याबद्दल दिलेली एक उपाधी आहे, जिचा अर्थ 'महान व्यक्ती' किंवा 'आदरणीय व्यक्ती' असा होतो. पेरियार यांच्या तत्त्वज्ञानाची महानता ते बहुसंख्य लोकांच्या किती कामी आले यावरून तोलायची ठरवली आणि पेरियार यांचे तत्त्वज्ञान एका पारड्यात व इतिहासातील इतर सर्व तत्त्ववेत्यांचे तत्त्वज्ञान दुसऱ्या पारड्यात ठेवून ते तोलले तर पेरियार यांच्या तत्त्वज्ञानाचेच पारडे अधिक जड होईल; इतके ते मानवजातीसाठी उपयोगाचे ठरणारे आहे. धर्माच्या परिघातून बाहेर पडून आणि नास्तिकतेचा धागा पकडून


समाजसुधारणा घडवून आणणारे पेरियार हे देशातील त्यावेळचे एकमेव समाजसुधारक होते. त्यांनी आपल्या सुधारणा चळवळींनी दक्षिण भारतात जी क्रांती आणली, तशा प्रकारचे उदाहरण भारताच्या इतिहासात मागील दोन हजार वर्षांमध्येही सापडत नाही, असे गौरवोद्गार प्रसिद्ध अमेरिकन इतिहासकार जॉन रॅले यांनी पेरियार यांच्याविषयी काढले होते.




7. **पुस्तकाचे नाव : छत्रपती संभाजी महाराज**
**लेखक : डॉ.इस्माईल हुसेनसाहेब पठाण**
**किंमत : ३९९/-**
**विशेष सवलतीत : ३२०/-**

डॉ. पठाण यांच्या संभाजी चरित्राचे वैशिष्ट्य काय ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा जेव्हा आम्ही प्रयत्न केला तेव्हा आमच्या लक्षात आले की, एका धर्मनिरपेक्षवादी मुस्लीम लेखकाने लिहिलेले हे महाराष्ट्रातील पहिले संभाजीचरित्र आहे. आज समाजातील काही विशिष्ट गट संभाजी महाराजांनी दिलेल्या लढ्यास हिंदू विरुद्ध मुस्लीम असा रंग देऊन तो धार्मिक लढा होता, असे भासवून या राजास 'धर्मवीर' म्हणून घोषित करीत असताना या ग्रंथाने या घोषणेला छेद दिला आहे. औरंगजेबाने सुरु केलेले हे युद्ध खऱ्या अर्थाने साम्राज्यवादी होते व त्याला विरोध करून त्याच्याशी लढणाऱ्या मराठ्यांचे युद्ध हे त्याच अर्थाने स्वातंत्र्यवादी होते. इथे हिंदू विरुद्ध मुस्लीम असा धर्माचा काही प्रश्नच निर्माण होत नाही, हे ऐतिहासिक सत्य डॉ. पठाण यांच्या या ग्रंथातून दृग्गोचर होते आहे आणि हेच सत्यकथन या ग्रंथाचे यश आहे असे आम्हांस वाटते.

-डॉ. जयसिंगराव पवार ज्येष्ठ इतिहासकार




८. **पुस्तकाचे नाव : रवींद्रनाथांच्या सहवासात**

**लेखक : मैत्रेयी देवी / अनुवाद : विलास गिते**

**किंमत :** ४००/-

**विशेष सवलतीत : ३००/-**

श्रीमती मैत्रेयी देवी यांनी 'मंग्पूते रबीन्द्रनाथ' नावाचे, कविश्रेष्ठ रवीन्द्रनाथ ठाकूर यांच्या हृद्य आठवणींविषयीचे एक नितांत सुंदर पुस्तक बंगालीत लिहिले आहे. रवीन्द्रनाथांच्या नाना छटा असलेल्या स्वभावविशेषांचे अनोखे दर्शन या पुस्तकात घडते. 'मंग्पूते रबीन्द्रनाथ'चा हा मराठी अनुवाद 'रवीन्द्रनाथांच्या सहवासात.' 'रवीन्द्रनाथांच्या सहवासात' हा अनुवाद छान झाला आहे. एका महाकवीच्या सहवासाची ही कहाणी आहे. अतिशय हृद्य असे हे पुस्तक मराठीत येत आहे याचे मला फार समाधान वाटले. - **पु. ल. देशपांडे**




९. **पुस्तकाचे नाव : एका यशस्वी युरोलॉजिस्टची वाटचाल**

**(आत्मचरित्र : डॉ . शरद द. बापट )**

**लेखक : शिल्पा शिवलकर**

**किंमत :** ४५०/-


**विशेष सवलतीत : ३४०/-**

डॉ. शरद बापट यांच्या ९३ वर्षांच्या आयुष्याने सातारा, लाहोर, पुणे, अहमदाबाद, लंडन, मुंबई असा प्रवास केला आहे. पण हे पुस्तक म्हणजे निव्वळ डॉ. बापट यांचे आत्मकथन नाही. युरोलॉजी या वैद्यकीय शाखेच्या भारतातील वाटचालीचाही हा आलेख आहे.पूर्ण देशात ज्यांनी एंडोस्कोपिक युरोलॉजीचा पाया घातला, त्यात डॉ. बापट अग्रगण्य आहेत. मुंबईच्या सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेतील युरोलॉजीचा पहिला स्वतंत्र बाह्यरुग्णविभाग त्यांनी सायन इस्पितळात सुरू केला. शिक्षक म्हणून युरोलॉजिस्टांच्या चार पिढ्या त्यांनी घडवल्या.

मूत्रपिंड आरोपणाच्या तंत्रावर हात बसावा म्हणून त्यांनी कुत्र्यांवर दोन वर्षे प्रयोग केले होते.

तर अलिकडे रोबोटिक कॉन्सोल शस्त्रक्रियेचे तंत्र भारतात आणण्यातही त्यांचा पुढाकार होता.

गेल्या ६० वर्षांतल्या या अचाट तांत्रिक प्रगतीचा प्रवास इथे सोप्या शैलीत उलगडून दाखवला आहे. त्याचबरोबर, वाढलेल्या प्रोस्टेटपासून लघवीची जळजळ होणे अशा नेहमीच्या तक्रारींवरच्या उपचारांचे अनुभव आणि त्याबाबतची निरीक्षणेही यामध्ये रंजकपणे मांडलेली आहेत. सामान्य वाचकांपासून वैद्यकीय विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनाच मार्गदर्शक ठरेल, असा हा दस्तावेज आहे




**10. पुस्तकाचे नाव : खोंबारा**

**लेखक : प्रमोद मनोहर कोपर्डे**

**किंमत : ५००/-**

**विशेष सवलतीत : ४०० /-**

खोंबारा या फार समर्पक शीर्षकाची ही कादंबरी. खोंबारा म्हणजे अशी जखम जी खोलवर टोचते आणि मग फाटल्यागत होते. भरून यायला फार काळ जावा लागतो.

एका लहानशा गावातल्या पत्रकाराच्या धडपडीचा, त्याच्या सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक, वैचारिक घडणीचा, त्याच्या नाट्यप्रेमाचा, त्याच्या मैत्रीचा, त्याच्या अपयशी प्रेमाचा, त्याच्या कौटुंबिक समस्यांचा, त्याच्या व त्याच्या आईच्या नात्याचा दीर्घ प्रवास या कादंबरीत रेखला आहे.विविध घटितांमागचे कार्यकारणतत्त्व उलगडण्याचा नायकाचा प्रयत्न, त्याची चिंतनशीलता आणि सर्वच कथनाला असणारा भावनिक ओलावा यांचा प्रत्यय देणारी, अतिशय ओघवत्या निवेदनशैलीतली ही नायकाच्या संघर्षाची कहाणी आहे.

कै. केशवराव कोठावळे कादंबरीलेखन स्पर्धेतील ही तृतीय क्रमांक विजेती कादंबरी. वाचकांना समकालीन जगण्याचे वेगळे भान देणारी...

*-डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी*